सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १६२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ३ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## प्रशांत किशोरांनी भाजप अध्यक्षांच्या बालेकिल्ल्याला पाडले भगदाड

### बांकीपूर पोटनिवडणुकीत मिळवला मोठा विजय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ पाटणा–** बिहारच्या बांकीपूर विधानसभा पोट निवडणुकीची सध्या देशभरात चर्चा आहे. पडद्यामागून राजकीय रणनीती आखणारे आणि २०२२ पासून बिहारच्या राजकारणात सक्रीय झालेले प्रशांत किशोर अर्थात पीके यांनी बांकीपूरची पोटनिवडणूक लढवली. त्यांनी या निवडणुकीत भाजपचे नीरज कुमार यांना लढत दिली. सकाळी ८ वाजतापासून मतमोजणीला सुरुवात झाली असून ३१ फेऱ्यांच्या अंती आता हा निकाल समोर आला आहे. पहिल्या फेरीपासून आघाडीवर राहिलेले प्रशांत किशोर हे शेवटपर्यंत आघाडीवर राहिले आणि त्यांनी भाजपच्या बालेकिल्ल्यातूनम मोठा विजय मिळवला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, बांकीपूर हा भाजपचा गड मानला जातो. तीन दशकांपासून या मतदारसंघावर भाजपचे नितीन नबीन सिन्हा यांच्या घराण्याचे वर्चस्व राहिलेले आहे. मात्र, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्षपद मिळाल्यानंतर नितीन नबीन यांनी आमदारकीचा राजीनामा दिला. त्यामुळे बिहारची राजधानी पाटण्यातील बांकीपूर विधानसभेची पोटनिवडणूक घेण्यात आली.



प्रशांत किशोर यांच्यासह एकूण २५ उमेदवारांनी बांकीपूर विधानसभा पोटनिवडणूक लढवली होती. ज्यामध्ये प्रशांत किशोर यांनी तब्बल २० हजारांपेक्षा अधिक मतांनी भाजपचे उमेदवार नीरज कुमार यांचा पराभव केला. महत्त्वाची बाब म्हणजे, बांकीपूर पोटनिवडणुकीमध्ये जेव्हा प्रशांत किशोर यांनी उमेदवारी जाहीर केली तेव्हा भाजप नेते रविशंकर प्रसाद यांनी भाजपमधून बांकीपूरमधून कुत्र्या-मांजराला उमेदवारी दिली तरी ते जिंकून येतील, असे वक्तव्य केले होते. त्यामुळे त्यांचा हाच आत्मविश्वास भाजपचे कमळ कोमजविण्यासाठी कारणीभूत ठरला का? असा प्रश्न आता निवडणुकीच्या निकालामुळे निर्माण झाला आहे. तर, प्रशांत किशोर यांनी सुद्धा हाच मुद्दा निवडणुकीमध्ये लावून धरला होता आणि तुम्हाला भाजप कशा पद्धतीने गृहीत धरते याची विचारणा प्रत्येक सभेमध्ये केली होती. त्यामुळे यंदाच्या वेळेस प्रशांत किशोर यांची रणनिती कामी आली असून त्यांना याचा मोठा फायदा झाला आहे.

## आधी पंतप्रधानांनी डिग्री दाखवावी मग मी माझे कागदपत्रे दाखवेन

### वडिलांवरील तक्रारीवरून अभिजित दिपकेंचा पलटवार

### ५ तारखेला CJP ची महत्वाची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ छत्रपती संभाजीनगर**

कॉकरोच जनता पार्टीची पुढील दिशा आणि अजेंडा ठरवण्यासाठी येत्या ५ तारखेला पक्षाच्या कोअर कमिटीची एक महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. तत्पूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सीजेपीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी सरकारवर टीका केली आहे. आपल्या वडिलांविरोधात झालेल्या तक्रारीवरून त्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिग्रीचा मुद्दा उपस्थित करत सरकारला खुले आव्हान दिले आहे.

अभिजित दिपके यांच्या शिक्षणाचा खर्च त्यांच्या कुटुंबाने कसा उचलला? यावरून त्यांच्या वडिलांविरोधात एक तक्रार दाखल करण्यात आली आहे. यावर आक्रमक प्रतिक्रिया देताना दिपके म्हणाले, मी माझ्या शिक्षणासाठी मिळालेल्या स्कॉलरशिपचे आणि लोनचे कर्जाचे लेटर दाखवायला कधीही तयार आहे. पण माझी एकच अट आहे की, आधी पंतप्रधानांनी त्यांची डिग्री सार्वजनिक करावी. त्यांनी त्यांची डिग्री दाखवली, तर मी माझी सर्व कागदपत्रे सार्वजनिक करेन.

सरकारच्या धोरणांवर प्रहार करताना दिपके पुढे म्हणाले की, ज्यांना जी काही चौकशी करायची आहे ती त्यांनी खुशाल करावी. देशात सध्या असे वातावरण आहे की, जेव्हा जेव्हा कोणी या सरकारच्या विरोधात बोलते किंवा त्यांना प्रश्न विचारते, तेव्हा हे लोक त्यांचा आवाज दाबण्यासाठी ईडी आणि सीबीआय सारख्या यंत्रणा मागे लावतात. आताही तेच सुरू आहे.झारखंडमध्ये नुकत्याच उघडकीस आलेल्या



पेपरफुटी प्रकरणावरही त्यांनी भाष्य केले. झारखंडमध्ये पेपर फुटल्यानंतर तेथील विद्यार्थ्यांशी माझे बोलणे झाले आहे. मी त्यांना स्पष्ट सांगितले आहे की, जोपर्यंत तुमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत अजिबात मागे हटू नका. कॉकरोच जनता पार्टी या लढ्यात पूर्णपणे तुमच्या पाठीशी उभी आहे. विद्यार्थ्यांना जी काही मदत लागेल, ती आम्ही नक्की करू, असा विश्वास अभिजित दिपके यांनी यावेळी व्यक्त केला.

आगामी बैठकीबाबत माहिती देताना अभिजित दिपके म्हणाले की, आमचा पुढचा अजेंडा ठरवण्यासाठीच आम्ही ५ तारखेला कोअर कमिटीची बैठक बोलावली आहे. ही बैठक छत्रपती संभाजीनगरमध्ये माझ्याच घरी पार पडेल. या बैठकीला पक्षाचे प्रवक्ते आणि ज्या कोअर टीम मेंबरनी आम्हाला आंदोलन मॅनेज करण्यात मोठी मदत केली, ते सर्वजण उपस्थित राहतील. सीजेपी'ची चळवळ पुढे कशी घेऊन जायची आणि पक्षाचे संघटन कसे मजबूत करायचे, यावर या बैठकीत सविस्तर चर्चा केली जाईल.

## खासगी वाहनांवर 'पोलिस' पाटी लावणे भोवणार!:राज्यभर कडक कारवाईचे आदेश

### अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी कठोर पाऊल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ मुंबई–** राज्यातील खासगी दुचाकी किंवा चारचाकी वाहनांवर 'पोलिस' असे लिहिणाऱ्यांवर किंवा तशी लाल पाटी लावून फिरणाऱ्यांवर लवकरच कडक कारवाई होणार आहे. वाहतूक विभागाचे अप्पर पोलिस महासंचालक कार्यालयाने यासंदर्भात गांभीर्याने दखल घेतली असून, राज्यातील सर्व पोलीस आयुक्त आणि पोलिस अधीक्षकांना तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या खासगी वाहनांवर अशी पाटी लावण्यावर थेट निर्बंध येणार आहेत.

पोलिस अधिकारी आणि अंमलदार बऱ्याचदा त्यांच्या खासगी वाहनांवर लाल रंगाची 'पोलिस' पाटी लावतात. अशा वाहनांवर पोलिसांची पाटी असल्याने तपासणी नाक्यांवर त्यांची फारशी चौकशी किंवा तपासणी केली जात नाही. याच गोष्टीचा गैरफायदा घेत अनेकदा भाडेतत्त्वावर या गाड्यांचा वापर अवैध वस्तूंच्या वाहतुकीसाठी केला जाण्याची दाट शक्यता असते. तसेच, यातून समाजात दहशत निर्माण होण्याची व चुकीच्या कामांना खतपाणी मिळण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.खासगी वाहनांवर सर्रासपणे 'पोलिस' असे लिहून फिरण्याच्या या वाढत्या प्रकारावर मुंबई उच्च न्यायालयानेही तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालयाने या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालत, अशा प्रकारे बेकायदेशीररीत्या पाट्या लावून फिरणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. न्यायालयाच्या याच ठाम भूमिकेमुळे आता पोलिस प्रशासनाने या कारवाईला वेग दिला असून नियम कडक केले आहेत.

**मोटार वाहन कायद्यांतर्गत होणार कारवाई**

प्राप्त झालेल्या आदेशांनुसार, सर्व पोलिस अधीक्षकांनी आपापल्या कार्यक्षेत्रात अशी 'पोलिस' पाटी किंवा लाल अक्षरात पोलिस नाव लिहिलेली खासगी वाहने आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशा कडक सूचना देण्यात आल्या आहेत. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ चे कलम १३३ (६) आणि मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १७७ अन्वये दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.




या संदर्भात सखाराम कुलकर्णी यांनी २७ जून २०२६ रोजी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना एक सविस्तर पत्र पाठवून या गंभीर प्रकाराकडे लक्ष वेधले होते. या पत्राची दखल घेत २८ जुलै २०२६ रोजी पोलिस महासंचालक कार्यालयाकडून अप्पर पोलिस महासंचालक (वाहतूक) कार्यालयाला पुढील कारवाईसाठी ईमेल प्राप्त झाला. त्यानुसार आता राज्यातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना कारवाईचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

## पंकजा मुंडेंना आला राजकारणाचा कंटाळा मात्र कॉंग्रेसने दिली थेट CM पदाची ऑफर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३मुंबई–** गेल्या काही दिवसांत राजकारणात अनेक बदल झाल्याचे पाहायला मिळाले. परंतु, या राजकारणातून सर्वात प्रतिष्ठित नेते असलेले माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे आणि त्यांची बहीण मंत्री पंकजा मुंडे या काही महिन्यांपासून लांब लांब असल्याचेच पाहायला मिळत आहे. पंकजा मुंडे या पर्यावरण मंत्री असल्या तरी त्यांचा राजकारणातला वावर कमी झाला आहे. अशातच आता पंकजा मुंडे यांनी केलेल्या निवृत्तीच्या विधानामुळे राजकीय वर्तुळात याबाबतची जोरदार चर्चा रंगली आहे. राजकारणातून रिटायर्ड व्हावंसे वाटते. मात्र, सभास्थळी उपस्थित नागरिकांचा उत्साह पाहिल्यानंतर आपल्याला नव्याने प्रेरणा मिळते, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी आपल्या मनातील गोष्ट बोलून दाखवली. परंतु, त्यांनी ही गोष्ट बोलताच त्यांना काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवारांनी एक मोठी ऑफर दिली आहे. त्यामुळे पंकजा मुंडे याबाबत नेमक्या काय बोलतात? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.



मंत्री पंकजा मुंडे यांनी राजकीय निवृत्तीबाबत विधान केल्याबाबत प्रसार माध्यमांकडून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांना विचारण्यात आला. तेव्हा याबाबत बोलताना ते म्हणाले की, पंकजा मुंडेंनी ओबीसींचे नेतृत्व करावे, भाजपमधून बाहेर पडावे. महाराष्ट्राच्या पहिल्या ओबीसी मुख्यमंत्री व्हा, यासाठी आम्ही आणि आमचा पक्ष तुम्हाला पूर्ण साथ देऊ. ज्यानंतर पंकजा मुंडे यांनी खरच भाजपा सोडली तर त्यांना काँग्रेसमध्ये घेणार का? असा सवाल केला. त्यावर ते म्हणाले, पंकजा मुंडे जर भाजपमधून बाहेर पडल्या तर आम्ही त्यांना १०० टक्के काँग्रेस पक्षात प्रवेश देऊ. त्यांना जर असे वाटत असेल की पक्षात योग्य न्याय मिळत नाही, कुटुंबाच्या त्यागाला काहीच महत्त्व दिले जात नाहीये, तर त्या नैराश्यातूनच त्यांनी राजकारणातून बाहेर पडण्याचे विधान केले असावे. पण पंकजा मुंडेंना विनंती राहील की, त्या सक्षम आणि मोठ्या ओबीसी नेत्या आहात. त्यामुळे राजकारणातून निवृत्त होण्यासारखे टोकाचे पाऊल न उचलता, बिंधास्तपणे भाजपमधून बाहेर पडा आणि राज्याच्या ओबीसी समाजाचे नेतृत्व करा, असे आवाहन वडेट्टीवार यांनी केले.

## Gen Z शी संवाद साधणार RSS चे सरसंघचालक मोहन भागवत, १०० शहरांतील २ हजारांहून अधिक तरुण एकत्र येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नागपूर–** दिल्लीतील जंतरमंतरवरील आंदोलनामुळे देशात सध्या जेन झींची चर्चा आहे. अशामध्ये भारतातील तरुण पिढी लोकशाही, नेतृत्व आणि राष्ट्रउभारणीच्या चर्चांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत ६ ऑगस्ट रोजी मुंबईत तरुण पिढीशी थेट संवाद साधणार आहेत. वांद्रे-कुर्ला संकुल येथील निता मुकेश अंबानी सांस्कृतिक केंद्रात जनरेशन झी (ऋश्नप न) तसेच, जनरेशन अल्फाच्या (ऋश्नप -श्रहिर) विद्यार्थ्यांसाठी विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनायटेड नेशन्सच्या (खखचणछ) १५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून या भव्य वार्षिक चॅम्पियनशिप परिषदेच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसीय परिषदेत देशभरातील १०० हून अधिक शहरांमधील १५ ते १९ वयोगटातील तब्बल २ हजारांहून अधिक हायस्कूल आणि महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी होणार आहेत. ही परिषद जगातील सर्वात मोठ्या युवा नेतृत्वाखालील संमेलनांपैकी एक मानली जाते. २०११मध्ये ऋषभ शाह यांनी स्थापन केलेले आयआयएमयूएन हे भारत या संकल्पनेचा जागतिक पातळीवर प्रसार करणारे व्यासपीठ आहे.



गेल्या १५ वर्षांपासून १५ ते २४ वयोगटातील तरुणच ही संस्था पूर्णपणे चालवत आहेत. या व्यासपीठावरून घडलेले अनेक तरुण पुढे जाऊन लोकप्रतिनिधी, आयएएस, आयपीएस अधिकारी, वकील, लेखक आणि उद्योगपती बनले आहेत. आयआयएमयूएनच्या सल्लागार मंडळात उद्योग, न्यायव्यवस्था आणि क्रीडा क्षेत्रातील दिग्गजांचा समावेश आहे. यामध्ये उद्योगपती अजय पिरामल, दीपक पारेख, नादिर गोदरेज, खासदार डॉ. शशी थरूर, माजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड, चित्रपट दिग्दर्शक करण जोहर, माजी लष्करप्रमुख आणि ऑलिम्पिकपटू पी. टी. उषा यांसारख्या नामवंत व्यक्तिमत्त्वांचा समावेश आहे.

## E -२० विरोधात नागपूर पेटले!

### मंत्री नितीन गडकरी यांच्या घरासमोर कॉंग्रेस चे जोरदार आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नागपूर –** केंद्र सरकारच्या ई-२० या इथेनॉल मिश्रित पेट्रोल धोरणासह वाढती महागाई, बेरोजगारी आणि नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसने आज आक्रमक पवित्रा घेतला. नागपूरमध्ये केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानावर युवक काँग्रेसने 'जनआक्रोश मोर्चा' काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार झटापट झाली असून, पोलिसांनी बॅरिकेडिंग करून हा मोर्चा मध्येच रोखला व अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. या मोर्चाचे प्रमुख कारण हे केंद्र सरकारचे 'ई-२० इथेनॉल मिश्रित पेट्रोल' धोरण असल्याचे सांगितले जात आहे. या धोरणामुळे सर्वसामान्यांच्या गाड्यांचे इंजिन खराब होत असून, त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. इथेनॉल निर्मिती करून गाड्यांचे आणि गोरगरिबांचे मोठे नुकसान केले आहे, त्यामुळे नितीन गडकरी यांनी राजीनामा द्यावा, अशी आक्रमक मागणी कार्यकर्त्यांनी केली. यासह महागाई, बेरोजगारी आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याशी जोडला गेलेला 'नीट' पेपरफुटीचा विषय यांवरूनही मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न या आंदोलनाद्वारे करण्यात आला.

या मोर्चामध्ये तरुण वर्गाचा आणि युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. अलीकडेच दिल्लीतील जंतरमंतरवर शिक्षणमंत्र्यांविरोधात झालेल्या आंदोलनाचा संदर्भ देत आंदोलकांनी हातात फलक घेतले होते. धर्मेंद्र प्रधान तो बस झाकी है, गडकरी-मोदी बाकी है, अशा आशयाचे फलक घेऊन आणि जोरदार घोषणाबाजी करत कार्यकर्ते गडकरींच्या घराकडे निघाले होते.'ई-२०' पेट्रोलच्या मुद्द्यावरून सोशल मीडियावर सुरू असलेल्या नाराजीला युवक काँग्रेसने रस्त्यावरील आंदोलनाचे रूप देत थेट नितीन गडकरी यांना लक्ष्य केले. मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने हा मोर्चा त्यांच्या घरापर्यंत पोहोचू शकला नाही.

**पोलिसांची तगडी नाकेबंदी आणि झटापट**

या आंदोलनाची पूर्वकल्पना असल्यामुळे पोलिसांनी गडकरींच्या निवासस्थानाकडे (देवगिरी बंगल्याकडे) जाणाऱ्या सर्व मार्गांवर म्हणजेच चिटणीस सेंटर ते शिवाजी चौकादरम्यान मोठी नाकेबंदी केली होती. मोर्चेकरी जेव्हा बॅरिकेड्सजवळ पोहोचले, तेव्हा त्यांनी ती तोडण्याचा आणि थेट बॅरिकेड्सवर चढून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही कार्यकर्त्यांनी थेट बॅरिकेड्सवर चढून घोषणाबाजी सुरू केली. पोलीस आणि कार्यकर्त्यांमध्ये मोठा संघर्ष पाहायला मिळाला. पोलिसांनी बॅरिकेड्सवर चढलेल्या कार्यकर्त्यांना उचलून थेट पोलिसांच्या व्हॅनमध्ये कोंबले. या झटापटीत पोलिसांनी बळाचा वापर करून आंदोलकांना पांगवण्याचा प्रयत्न केला.





**विनापरवाना मोर्चा; आंदोलकांना घेतले ताब्यात**

घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, या मोर्च्याला पोलिसांची पूर्वपरवानगी नव्हती. युवक काँग्रेसतर्फे काढण्यात आलेल्या या मोर्च्याला कोणतीही परवानगी देण्यात आली नव्हती. त्यामुळे आम्ही सुरक्षेच्या कारणास्तव या सर्व आंदोलकांना ताब्यात घेतले आहे आणि त्यांच्यावर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे, असे पोलिसांनी स्पष्ट केले. यानंतर उर्वरित मोर्चेकऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना पोलिसांनी पुन्हा काँग्रेस भवनच्या दिशेने माघारी पाठवले.

## संपादकीय ......

# परीक्षा सुधारणा विधेयक स्वागतार्ह, पण

*देशात गेल्या काही वर्षांत पेपरफुटी हा जणू सार्वजनिक परीक्षांचा अविभाज्य भाग बनला होता. नीट असो, भरती परीक्षा असो, राज्य लोकसेवा आयोगांच्या परीक्षा असोत किंवा इतर स्पर्धा परीक्षा, प्रत्येकवेळी विद्यार्थ्यांना टेन्शन असते ते पेपरफुटीचे. लाखो तरुणांचे आयुष्य, कुटुंबांच्या अपेक्षा आणि अनेक वर्षांच्या कष्टांवर पेपर फोडणारे संघटित गुन्हेगार पाणी फेरतात. या पार्श्वभूमीवर लोकसभेने सार्वजनिक परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी सुधारणा विधेयक मंजूर केले, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. मात्र, या विधेयकाचे खरे मूल्यमापन त्यातील शिक्षांच्या कठोरतेवर नव्हे, तर त्यातून परीक्षा व्यवस्थेवर पुन्हा विश्वास निर्माण होतो का, यावर होणार आहे. या सुधारणा विधेयकातून २०२४ च्या कायद्यात अधिक कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. पेपरफुटीच्या गुन्ह्यांची जलद चौकशी, विशेष तपास पथके, विशेष सरकारी वकील, फास्ट ट्रॅक न्यायालये आणि वेळबद्ध अपील प्रक्रिया यांचा समावेश करण्यात आला आहे. पेपरफुटी हा साधा गैरप्रकार नसून संघटित गुन्हा मानून त्यावर जलद आणि कठोर कारवाई व्हावी, इतका सरळ उद्देश या विधेयकाचा आहे.*

*आजवर अनेक प्रकरणांत गुन्हेगार पकडले गेले, पण न्यायालयीन प्रक्रियेतील विलंबामुळे त्यांना शिक्षाच झाली नाही किंवा शिक्षा होईपर्यंत त्यांचा धाकही संपला. त्यामुळे गुन्हेगारांच्या मनात कायद्याबद्दल भीती उरली नव्हती. हे चित्र बदलण्याचा प्रयत्न या विधेयकातून दिसतो. पण एक मूलभूत प्रश्न विचारायलाच हवा. पेपर फुटतो कसा? प्रश्नपत्रिका स्वत: चालत बाहेर येत नाही. ती एखाद्या अधिकार्याच्या, कर्मचार्याच्या, परीक्षा संस्थेच्या किंवा तंत्रज्ञान व्यवस्थेच्या संगनमताशिवाय बाहेर पडू शकत नाही. समस्या व्यवस्थेच्या प्रामाणिकपणाची आहे. जेथे भ्रष्टाचाराला संरक्षण मिळते, तेथे कितीही कठोर कायदे केले, तरी त्यांचा उपयोग मर्यादितच राहतो. भ्रष्ट अधिकार्यांना राजकीय संरक्षण, तपासातील ढिलाई आणि शिक्षा होण्यास लागणारा विलंब, या सगळ्या गोष्टी पेपरफुटी उद्योगाला खतपाणी घालत आल्या आहेत. त्यामुळे नवीन कायद्याची खरी परीक्षा व्यवस्थेतील 'आतील' दोषींवर कारवाई करण्यात असेल.*

*या विधेयकाचा आणखी एक सकारात्मक पैलू म्हणजे पेपरफुटीला 'संघटित गुन्हेगारी' म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन. आतापर्यंत हा प्रकार एखाद्या स्वतंत्र घटनेप्रमाणे हाताळला जात होता. प्रत्यक्षात ही संपूर्ण साखळी आहे. प्रश्नपत्रिका मिळवणारे, ती विकणारे, उत्तरपत्रिका बदलणारे, बनावट उमेदवार उभे करणारे, डिजिटल हॅकिंग करणारे आणि त्यातून कोट्यवधींची कमाई करणारे रॅकेट देशभर कार्यरत आहेत. त्यामुळे अशा टोळ्यांवर आर्थिक आणि फौजदारी, दोन्ही पातळ्यांवर घाव घालणे आवश्यक होते. या दृष्टीने सुधारणा योग्य दिशेने टाकलेले पाऊल म्हणावे लागेल. तरीही केवळ शिक्षेची भीती निर्माण करून प्रश्न सुटणार नाहीत. परीक्षेची संपूर्ण साखळी तांत्रिकदृष्ट्या अभेद्य करावी लागेल. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते छपाई, वाहतूक, डिजिटल एन्क्रिप्शन, परीक्षा केंद्रांचे निरीक्षण, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित संशयास्पद व्यवहारांचे विश्लेषण आणि परीक्षेनंतरचे लेखापरीक्षण, या सर्व टप्प्यांमध्ये सुधारणा कराव्या लागतील. प्रत्येक घटकाची जबाबदारी निश्चित झाली, तरच कायद्याला अर्थ प्राप्त होईल.*

*सरकारनेही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. विश्वास हा कायद्याने निर्माण होत नाही; तो सातत्यपूर्ण कृतीने निर्माण होतो. गेल्या काही वर्षांत झालेल्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा विश्वास इतका ढासळला आहे की, आता ते कोणत्याही परीक्षेकडे संशयाने पाहतात. हा संशय दूर करण्यासाठी प्रत्येक प्रकरणात पारदर्शक तपास, दोषींना जलद शिक्षा आणि चौकशीचा सार्वजनिक अहवाल आवश्यक आहे. अन्यथा, नवीन कायदाही जुन्याच फाईलमध्ये धूळ खात पडेल. या विधेयकावरील चर्चेत विरोधकांनी राष्ट्रीय परीक्षा संस्थांच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. केवळ खालच्या पातळीवरील कर्मचार्यांवर कारवाई करून चालणार नाही, तर परीक्षा घेणार्या संस्थांची जबाबदारीही निश्चित झाली पाहिजे, अशी मागणी करण्यात आली. ही मागणी योग्यच आहे. उत्तरदायित्वाशिवाय सुधारणा अपूर्ण राहतात. या विधेयकाच्या निमित्ताने सरकारने पेपरफुटीच्या प्रश्नाचे गांभीर्य मान्य केले आहे.*

*विद्यार्थी संघटना, समाजातील विविध घटक आणि अनेक शिक्षणतज्ज्ञ सातत्याने कठोर कायद्याची मागणी करत होते. त्या मागणीची दखल घेतली गेली, हे महत्त्वाचे आहे. मात्र, कायदा मंजूर करणे हा शेवट नसून सुरुवात आहे. त्याची अंमलबजावणीच त्याचे यश किंवा अपयश ठरवणार आहे. देशातील तरुणांना आता विश्वासाची गरज आहे. प्रत्येक परीक्षा वेळेत झाली पाहिजे, निष्पक्ष झाली पाहिजे आणि निकालही वेळेत लागला पाहिजे. परीक्षेचा दिवस हा भीतीचा नव्हे, तर आत्मविश्वासाचा असला पाहिजे. ज्याने प्रामाणिकपणे अभ्यास केला आहे, त्याला कोणत्याही रॅकेटची भीती वाटता कामा नये. हे वातावरण निर्माण करणे ही सरकारची, परीक्षा संस्था, तपास यंत्रणा आणि न्यायव्यवस्था या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.*

*लोकसभेने मंजूर केलेले परीक्षा सुधारणा विधेयक हे त्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. मात्र, गतअनुभव लक्षात घेता, भारतात कायद्यांत कमतरता नसते; कमतरता असते ती त्यांच्या निर्भीड अंमलबजावणीत. जर या वेळीही कठोर शब्द कागदावरच राहिले आणि दोषींना पुन्हा संरक्षण मिळाले, तर विद्यार्थ्यांचा भ्रमनिरास आणखी वाढेल. पण जर या कायद्याने खरोखरच पेपरफुटीच्या मुळावर घाव घातला, दोषींना वेळेत शिक्षा झाली आणि प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या गुणवत्तेच्या बळावर यश मिळू लागले, तर ही भारतीय परीक्षा व्यवस्थेच्या पुनरुत्थानाची सुरुवात ठरेल.*

# आठ तालुक्यातील ५७ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान

## ४० महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद, शेतकरी पुन्हा संकटात, पंचनाम्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** जुलै दरम्यान झालेल्या मुसळधार, तर काही भागांत ढगफुटीसदृश पावसाने खरीप हंगामाला मोठा फटका बसला आहे. निकृष्ट सोयाबीन बियाण्यांच्या समस्येतून सावरत असलेल्या शेतकऱ्यांवर आता अतिवृष्टीचे दुहेरी संकट कोसळले आहे. जिल्हा प्रशासनाच्या प्राथमिक अहवालानुसार, आठ तालुक्यांतील ४१९ गावांमधील तब्बल ५७हजार ६८९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून महसूल विभागाला तातडीने पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, तूर, मका आणि धान या प्रमुख खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, अनेक शेतांमध्ये अजूनही पाणी साचले असून उभी पिके कुजण्याच्या मार्गावर आहेत. अवघ्या दोन दिवसांत जिल्ह्यात सरासरी ७६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून तब्बल ४० महसूल मंडळांत अतिवृष्टी

नोंदविण्यात आली आहे. या नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक वाहून गेल्याने आर्थिक अडचणी अधिकच वाढल्या आहेत. तालुकानिहाय नुकसानीचा विचार केला असता नांदगाव खंडेश्वर तालुक्याला सर्वाधिक फटका बसला आहे. या तालुक्यातील १०९ गावांमधील ३१ हजार १५१ हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन, कापूस आणि तुरीची पिके बाधित झाली आहेत. त्यानंतर मोर्शी तालुक्यातील ८५ गावांमध्ये १९ हजार ५०६ हेक्टर, भातकुली तालुक्यातील ११५ गावांमध्ये ४ हजार ५२१ हेक्टर, तर धामणगाव रेल्वे तालुक्यातील ७५ गावांमध्ये २ हजार १३८ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. याशिवाय धारणी तालुक्यात १३५.४० हेक्टर, चांदूर रेल्वे तालुक्यात २३४ हेक्टर, चिखलदरा तालुक्यात ३ हेक्टर आणि अंजनगाव सुर्जी तालुक्यात १.४० हेक्टर क्षेत्रा-वरील पिकेही अतिवृष्टीमुळे बाधित झाली आहेत. जिल्ह्यातील अनेक नद्या-नाले दुथडी भरून वाहिल्याने शेतांमध्ये पाणी साचले, तर काही ठिकाणी पिके पूर्णपणे जलमय झाली. प्रशासनाने महसूल व कृषी विभागाला तातडीने पंचनामे पूर्ण करून शासनाकडे अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.



### भातकुली तालुक्यात ४२ घरांची पडझड

गत गुरुवार आणि शुक्रवारी झालेल्या मुसळधार पावसाने भातकुली तालुक्यात मोठे नुकसान झाले आहे. सलग कोसळलेल्या पावसामुळे ८ गावांतील ४२ घरांची पडझड झाली असून, ११५ गावांमधील ४५२१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक नोंद प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, तूर आणि कापूस या प्रमुख खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी शेतांमध्ये पाणी साचल्याने पिके आडवी पडली आहे.

### २१ महसूल मंडळांत १०० मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस

नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, अमरावती आणि भातकुली या पाच तालुक्यांतील २१ महसूल मंडळांमध्ये २४ तासांत १०० मिलिमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला, नद्या-नाल्यांना पूर आला आणि शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

### पुढील तीन ते चार दिवस मध्यम पावसाचा अंदाज

हवामान विभागानुसार, अमरावतीसह विदर्भात पुढील तीन ते चार दिवस हलका ते मध्यम स्वरूपाचा विखुरलेला पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार वारे वाहण्याचा इशारा देण्यात आला असून शेतकऱ्यांनी शेतात्तील पाण्याचा निचरा करण्यासह आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### अंजनगाव बारी ग्रामपंचायतीचा ठराव

## स्वतंत्र पोलिस स्टेशन स्थापनेची मागणी, आमसभेत एकमुखी पाठिंबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अंजनगाव बारी**
अंजनगाव बारी येथे स्वतंत्र पोलिस स्टेशन स्थापन करण्याच्या मागणीला ग्रामसभेने एकमुखी पाठिंबा दिला आहे. यासंदर्भातील ठराव सर्वानुमते मंजूर करून तो शासन आणि वरिष्ठ पोलिस प्रशासनाकडे पाठवण्यात आला आहे.

ग्रामसभेत मंजूर झालेल्या ठरावानुसार, अंजनगाव बारी हे बडनेरा विधानसभा मतदारसंघातील सर्वात मोठे गाव आहे. म्हसला, वळद, गोविंदपूर, पार्डी आणि उदखेड या गावांचा समावेश करून येथे स्वतंत्र पोलिस स्टेशन स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे.सध्या नागरिकांना पोलिस ठाण्याशी संबंधित कामांसाठी दूरच्या पोलिस ठाण्यांवर अवलंबून राहावे लागते. यामुळे वेळ आणि आर्थिक खर्च वाढतो. नागरिकांना तातडीने आणि प्रभावी पोलिस सेवा मिळावी, कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम व्हावी, तसेच वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीने अंजनगाव बारी येथे स्वतंत्र पोलिस स्टेशनची आवश्यकता असल्याचे ग्रामसभेने ठरावात नमूद केले आहे.

या मागणीवर लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. भाजपच्या बडनेरा ग्रामीण महिला मोर्चाच्या अध्यक्षा दिपाली मलवार यांनी या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

# वैशाली माडे यांच्या जिद्द आणि परिश्रमाची प्रेरणा घेवून यश मिळवा -कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

### आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** यश आपल्या पुढेच असते. मात्र थोडएशा अपयशाने खचून न जाता आपल्या विद्यापीठाची माजी विद्यार्थीनी, विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळवून देणारी प्रसिध्द गायिका वैशालीताई माडे यांच्या जिद्द आणि परिश्रमातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी यश मिळवावे. २०२५-२६ हे वर्ष विद्यापीठासाठी सुवर्णमयी वर्ष राहिले आहे आणि विद्यार्थ्यांनी ज्याप्रमाणे आपल्या विद्यापीठाचा राष्ट्रीय स्तरावर नावलौकीक केला, त्याचप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना केले. सत्र २०२५-२६ मध्ये मध्य विभाग, अखिल भारतीय व राष्ट्रीय कव्वाली आंतर विद्यापीठ अशा विविध स्पर्धांमध्ये अभूतपूर्व यश संपादन करुन प्राविण्य प्राप्त करणा-या विद्यार्थीकलावंत, साथिदार, प्रशिक्षक व चमू व्यवस्थापक यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर विशेष अतिथी म्हणून प्रसिध्द पार्श्वगायिका वैशाली माडे, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यापीठाच्यावतीने वैशाली माडे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहते यांनी सत्कार केला. तसेच २०२५-२६ मध्ये मध्य विभाग, अखिल भारतीय व राष्ट्रीय कव्वाली आंतर विद्यापीठ अशा विविध स्पर्धांमध्ये अभूतपूर्व यश संपादन करुन प्राविण्य प्राप्त करणा-या विद्यार्थी कलावंत, साथिदार, चमू व्यवस्थापक, प्रशिक्षक व इतरांचा रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन भव्य सत्कार करण्यात आला.संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, सूत्रसंचालन श्रीकृष्ण पखाले, डॉ. शितल तायडे यांनी, तर आभार कु. श्रावणी रोटे हिने मानले.



### युवा शक्ती ही देशाची ताकद – वैशाली माडे

प्रसिध्द गायिका वैशाली माडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या, जीवनात गुरूचे अधिक महत्व आहे. गुरूंमुळेच मी घडले आणि माझे स्वप्न पूर्णत्वास आले. आपल्या गुरूंची कौतुकाची थाप नेहमीच आपल्या पाठीवर राहिली आहे, असे सांगून युवा शक्ती हीच देशाची मोठी ताकद आहे. बक्षिस हे खरे तर प्रोत्साहन असते, असेच पुरस्कार विद्यार्थ्यांनी मिळवावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी चित्रपटामध्ये गायिलेले पिंगा .. हे गाणे देखील सादर केले.

# ६.७ लाखांचे ११९ क्विंटल लाडू साहित्य 'श्रीं'च्या चरणी समर्पित: संत श्री गजानन महाराज संस्थान

### शेगाव येथे भाविकांना गुरुवारी करणार लाडवाचे वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती –** संत श्री गजानन महाराजांच्या अमरावती शहरासह जिल्ह्यातील भाविकांनी समर्पण भावनेतून स्व-ईच्छेने एकत्रित केलेली बुंदीचे लाडू प्रसाद सामुग्री गुरुपौर्णिमेच्या पर्वावर बुधवार २९ जुलै रोजी श्री संत गजानन महाराज संस्थान शेगांव येथे सर्व आयोजकांनी समर्पित केली. या सामुग्रीची किंमत ६ लाख ७० हजार ६६७ रु. असून संस्थानाद्वारे आयोजकांना रितसर पावतीही देण्यात आली आहे. लाडू प्रसाद उत्सव समितीद्वारे ५ ते २८ जुलैपर्यंत राबवण्यात आलेल्या सेवा अभियानाच्या माध्यमातून ही सामुग्री एकत्र करून ती महाराजांच्या चरणी समर्पित करताना आयोजकांना अत्यानंद झाला. गुरुवार ६ रोजी या सामुग्रीपासून बुंदीचे लाडू तयार करून ते शेगाव येथे महाप्रसाद घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांना प्रसाद म्हणून वितरित केले जाणार आहेत. लाडू प्रसाद उत्सव समितीने यासाठी जिल्ह्यासह विदर्भातील विविध शहरांमध्ये संग्रह केंद्र तयार केले होते. तसेच ऑनलाईन समर्पणाची सुविधाही देण्यात आली होती. कोणी रुपयांद्वारे, कोणी साखर, कोणी चना डाळ, कोणी सुक्या मेव्याद्वारे आपली सेवा रूजू केली. शेगाव संस्थान दररोज दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना महाप्रसादात बुंदीचे लाडू वितरित करीत असते. यासाठी मोठ्या प्रमाणात शुद्ध तूप, साखर, हरभऱ्याचे पीठ, सुका मेवा लागतो. या महायज्ञात आपलेही योगदान असावे, या भावनेतून साहित्य संग्रहित करण्यात आले. गेल्या वर्षीही २ लाख २१ हजार रुपयांचे साहित्य संत श्री गजानन महाराजांच्या चरणी समर्पित करण्यात आले होते. हे सेवादानाचे कार्य असल्यामुळे लाडू प्रसाद उत्सव समितीने पूर्ण काम श्रद्धेने केले.

जिल्ह्यात अमरावती, बडनेरा, अचलपूरसह विविध मुख्य शहरांमध्ये संग्रह केंद्र तयार करण्यात आले होते. या सत्कार्यासाठी भाविकांनी आपापल्या क्षमतेनुसार सहकार्य केले. सुका मेवा १०३ किलो, हरभरा डाळ ५२, क्विंटल एकूण ११९.३ किलो, साखर ६६ क्विंटल



# पुरामुळे मालखेड-वडगावातील पुल गेला वाहून; ग्रामस्थ त्रस्त: नागरिकांची गैरसोय, तत्काळ दुरुस्ती करण्याची केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ मालखेड–** गेल्या दोन दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे अंजनगाव बारी परिसरातील वडगाव (जिरे) येथील रायधोळ नदीला मोठा पूर आला होता. या पुरामुळे वडगाव (जिरे)-मालखेड मार्गावरील पूल तसेच स्मशानभूमीकडे जाणारा शेतकऱ्यांचा रस्ता पुराच्या पाण्यात वाहून गेला. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, पादचारी व ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पुलाची दुरुस्ती तातडीने करावी, अशी मागणी पुढे आली आहे. दरम्यान, दरवर्षी पावसाळ्यात अशीच परिस्थिती निर्माण होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सध्या पूल वाहून गेल्याने शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मोठा वळसा घालावा लागत आहे. विद्यार्थ्यांच्या शाळेत ये-जा करण्यावरही परिणाम झाला आहे. तसेच स्मशानभूमीकडे जाणारा हा एकमेव मार्ग बंद झाल्याने अंत्यविधीसारख्या अत्यावश्यक कामांमध्येही अडथळे निर्माण होत आहेत. या भागातील शेतकऱ्यांना ये-जा करण्यासाठी हा एकमेव रस्ता आहे.



# खड्ड्यांमुळे अमरावतीकरांचा जीव टांगणीला

### मान्सूनपूर्व नियोजन आणि पॅचवर्कच्या कामाकडे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** अमरावती शहरात मान्सून पुन्हा सक्रिय झाल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. यामुळे महापालिकेच्या मान्सूनपूर्व नियोजनातील त्रुटी उघड झाल्या असून, वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.शहरातील मुख्य रस्त्यांपासून ते अंतर्गत गल्ल्यांपर्यंत सर्वत्र खड्डे पडले आहेत. राजापेठ रेल्वे उड्डाणपुलाचा परिसर, रेडीयंट हॉस्पीटलसमोरील रस्ता, मोतीनगर ते राजेंद्र कॉलनीचा रस्ता आणि डी मार्टजवळील साईनगरकडे जाणारे वळण यांसारख्या अनेक ठिकाणी मोठे खड्डे आहेत. पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचून रस्ता आणि खड्डा यातील फरक ओळखणे कठीण होते.यामुळे अनेक वाहनधारकांचे अपघात होत आहेत, विशेषतः दुचाकी घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. खराब रस्त्यांमुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि शाळकरी मुलांना पाठीच्या आणि मणक्याच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.रुक्मिणीनगरचे रहिवासी सुरेश देशमुख आणि इतर नागरिकांनुसार, प्रशासनाला केवळ कर वसुलीत रस असून, नागरिकांच्या जीवाची किंमत नाही. प्रशासक काळात ही परिस्थिती समजण्यासारखी होती, परंतु आता लोकप्रतिनिधी निवडून आल्याने त्यांनी तरी या गंभीर समस्येकडे लक्ष द्यावे, अशी त्यांची मागणी आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वीच रस्त्यांचे पॅचवर्क होणे आवश्यक होते, परंतु ते झाले नाही. त्यामुळे पावसाने विश्रांती घेताच तातडीने खड्डे बुजवावेत, अशी मागणी पुढे आली आहे.

महापालिका प्रशासनाने या समस्येकडे त्वरित लक्ष न दिल्यास अमरावतीकर तीव्र आंदोलन छेडण्याच्या तयारीत आहेत.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# शिस्तीतून लोकाभिमुख प्रशासन घडवा

## महसूलदिनी विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

महसूल विभाग हा संपूर्ण शासनाचा कणा आणि मुख्य चेहरा आहे. सामान्य जनता शासनाचे प्रतिनिधी म्हणून महसूल प्रशासनाकडे पाहते. त्यामुळे या विभागातील प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्या वर्तनात शिस्त, संवेदनशीलता आणि सहानुभूती आणून लोकाभिमुख प्रशासन घडवावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले. महसूल दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी से. नि. अपर आयुक्त सूरज वाघमारे, अपर आयुक्त संजय जाधव, अपर जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, सहायक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह विभागातील पुरस्कारार्थी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी विभागातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. विभागीय आयुक्त गुंडे पुढे बोलताना म्हणाल्या की, सध्या 'एल निनो'च्या परिणामांमुळे अत्यंत कमी दिवसांत अधिक पाऊस पडण्याचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती विभागात उद्भवलेल्या पूरपरिस्थिती वर मात करण्यासाठी येथील आपत्ती व्यवस्थापन केंद्र आणि बचाव पथकांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आपत्तीच्या काळात जिवाची पर्वा न करता नागरिकांचे जीव वाचविणाऱ्या कर्मचाऱ्यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.



### महसूल कर्मचाऱ्यांचा सन्मान

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महसूल कर्मचाऱ्यांचा विभागीय आयुक्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये विभागीय आयुक्त कार्यालयातील सूरज वाघमारे (अपर आयुक्त), संतोष आठरे (तहसीलदार), मधुकर धुळे (नायब तहसीलदार), संतोष चव्हाण (निम्नश्रेणी लघुलेखक), उषा गवई (अव्वल कारकून), शशिकांत पाचघरे (महसूल सहायक), संतोष चव्हाण (वाहन चालक), माया राजवाडे (शिपाई) यांचा समावेश आहे.

# शासनाची ३४ लाख ५७ हजारांनी फसवणूक

## कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या नावाने लुबाडणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती–** शासकीय योजनेतून कौशल्य विकासांतर्गत महिला व युवतींना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्याचे कारण पुढे करून शासनाची तब्बल ३४ लाख ५७ हजार ७८८ रुपयांनी फसवणूक करण्यात आल्याची घटना जिल्ह्यात घडली. स्वप्नील पांडे व त्यांच्या सहकाऱ्यांविरुद्ध येवदा पोलिस ठाण्यात फसवणूक व अपहाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पांडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'सत्य पुष्पांजली' नावाने एक प्रशिक्षण संस्था स्थापन केली.

नागपूरच्या शिवाजी कॉम्प्लेक्सजवळ प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचे मुख्यालय असल्याचे दस्तऐवज शासनाच्या संबंधित विभागाकडे सादर केले. याच संस्थेने कौशल्य विकास प्रशिक्षण अंतर्गत जिल्ह्यातील येवदा पोलिस ठाण्याच्या हद्दीत लोतवाडा येथील स्व. बाळासाहेब काळे महाविद्यालयातील स्व. बाळासाहेब काळे स्किल सेंटरची निवड केली. त्याकरिता संबंधित संस्थाचालक व शाळा प्रशासनाची भेट घेतली. स्वप्नील पांडे याच्या संस्थेकडून कौशल्य विकास अंतर्गत महिला व युवतींसाठी नर्सिंगचे प्रशिक्षण देण्याचे ठरविले होते. त्यासाठी त्याने महिला व युवतींकडून आलेले अर्ज आणि दस्तऐवजाद्वारे डिजिटल यादी तयार केली. पांडे याच्या संस्थेला शासनाकडून लोतवाडा येथील केंद्रात ४८० जणांना प्रशिक्षण देण्याची अनुमती मिळाली होती. प्रत्यक्षात ३६० प्रशिक्षणार्थ्यांची निवड प्रशिक्षणासाठी केल्याची यादी स्वप्नील पांडे व त्याच्या सहकाऱ्यांनी अपडेट करून ठेवली होती. लोतवाडा येथील महाविद्यालयाच्या केंद्रात नर्सिंगचे प्रशिक्षण हे १६ जुलै २०२५ ते २३ जुलै २०२६ या कालावधीमध्ये दिल्या जाणार होते. वास्तविक लोतवाडा येथील प्रशिक्षण संस्थेमधून कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण महिला व युवतींना वर्षभरामध्ये




दिल्याच गेले नाही. महाविद्यालयीन प्रशासनाने पांडे याच्याकडे विचारणा केली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. प्राचार्यांची दिशाभूल करून इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून आयोजित केलेल्या प्रशिक्षणाची प्रतिपूर्ती देयके ही शासनाकडे सादर करून स्वप्नील पांडे याच्या संस्थेने पहिल्या टप्प्यातील ३४ लाख ५७ हजार ७८८ रुपयांचे अनुदान लाटले. यामाध्यमातून त्याने शासनाची एकप्रकारे आर्थिक फसवणूक केली. त्यामुळे उद्योग विभागाचे उपायुक्त दत्तात्रय लक्ष्मण ठाकरे यांनी येवदा पोलिस ठाण्यामध्ये लेखी स्वरूपाची तक्रार केली. त्या आधारे स्वप्नील पांडे व त्याच्या सहकाऱ्यांसह त्या संस्थेविरुद्ध येवदा पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. इतरही जिल्ह्यांत आर्थिक घोळ संबंधित संस्थेने केवळ अमरावती जिल्ह्यातील लोतवाडा येथेच नव्हे तर राज्यातील इतरही जिल्ह्यांत वेगवेगळ्या संस्थेच्या नावाखाली कौशल्य विकास

द्विस्तरीय चौकशीतून सत्य उघड आर्थिक घोळ केल्याची लक्षणे दिसताच अमरावतीच्या कौशल्य विकास विभागाच्या अधिकाऱ्यांकडून याप्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्यानंतर शासनाने दुसऱ्या टप्प्यात अन्य अधिकाऱ्यांना लोतवाडा येथे तपासणीकरिता पाठविले. येथे स्वप्नील पांडे याच्या संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिल्याच गेले नसल्याचे निदर्शनात आल्यानंतर लाखो रुपयांचा आर्थिक घोळ उघडकीस आला.

# शिंदीचे नागरिक पाणीपुरवठ्यापासून वंचित

## सहा वर्षांपासून खासगी बोअरचा आधार, कायमस्वरूपी उपाययोजनेची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३पथ्रोट** प्रत्येक खेड्यागावात ग्रामपंचायतमार्फत पाणीपुरवठा योजना राबविल्या जाते. परंतु याला शिंदी बुद्रूक गाव हे अपवाद ठरले आहे. या गावात ग्रामपंचायतकडून रहिवाशांना पाणीपुरवठ्याबाबत कुठलीही योजना कार्यान्वित नाही. त्यामुळे मागील सहा वर्षांपासून येथील रहिवासी खासगी बोअरचा आधार घेऊन आपली दिनचर्या राबवित आहेत. साधारणतः सहा वर्षांआधी ग्रामपंचायत बोअरवेलच्या माध्यमातून गावाला पाणीपुरवठा सुरू होता. कालांतराने बोअरवेलचे पाणी आटल्याने हळूहळू गावात पाणीटंचाई सुरू झाली. त्यानंतर शासकीय नियमानुसार दोनशे फूट बोअरवेल करण्यात आले. परंतु पाण्याची पातळी खोल गेल्यामुळे तेवढ्या अंतरावर बोअरवेलला पाणी लागलेच नाही. त्यामुळे शासकीय नियमांचे उल्लंघन होत असल्याचे सांगून तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. परिणामी बोअर करणे बंद पडले. मग गावात पाणीटंचाई निर्माण झाली असताना गावकऱ्यांनी आपापसांत एकत्र येत एक स्थळ निर्धारित करून त्याठिकाणी बोअरवेल केले. आठ हजारांच्या जवळपास लोकसंख्या असलेल्या या गावात पाहता पाहता संपूर्ण गावात ५० च्या जवळपास बोअर झाले. तेव्हापासून गावात खासगी बोअरच्या माध्यमातून



पाणीपुरवठा सुरू आहे. परंतु यातच मागील काही दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू झाल्याने रहिवाशांना भरपावसात पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. अशावेळी त्यांना वैयक्तिकरित्याच महावितरणशी संपर्क साधून पाठपुरावा करावा लागतो. त्यावेळी अनेक समस्यांचा सामना करताना रहिवाशांच्या नाकीनऊ येत आहे. यावर ग्रामपंचायतने तत्काळ कायमस्वरूपी उपाययोजना कार्यान्वित करावी, अशी एकमुखी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या माध्यमातून गावात पाणीपुरवठा करण्यासाठी उपाययोजना सुरू करण्यात आलेली आहे. परंतु सदरचे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्यामुळे ती पूर्ण होईपर्यंत रहिवाशांना खासगी बोअरवरच अवलंबून राहावे लागणार आहे. याबाबत आम्ही एकसारखा पाठपुरावा करीत आहोत.

**वैशाली बोरोडे**–वाठ ग्रामपंचायत अधिकारी, शिंदी बुद्रूक.

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने वादळवारा, मुसळधार पाऊस यामुळे वारंवार विद्युत पुरवठा खंडित होतो. ग्राहकांच्या गैरसोयीचा विचार करून त्यावर उपाययोजना करण्यासाठी मेन्टेनन्सची कामे हाती घेतली आहेत. ती पूर्ण होताच पुढे वीजपुरवठा सुरळीत करण्यास सोयीचे होईल.

**प्रयास मांडवे,** सहायक अभियंता, महावितरण.

# आकाशपाळण्यावरून पडून पर्यटक गंभीर

## सुरक्षेचा प्रश्न, चिखलदरा येथील देवीपॉइंटवरील घटना जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३चिखलदरा**

येथील देवी पॉइंटवर असलेल्या आकाशपाळण्यातून पडल्याने एक पर्यटक गंभीर जखमी झाला. रविवारी (ता. २) ही घटना घडली. या घटनेमुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भारत भुजराज मेश्राम (वय २६, रा. हिवरा बु., ता. नांदगाव खंडेश्वर), असे गंभीर जखमी पर्यटकाचे नाव असून त्याच्यावर अमरावतीच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती चिखलदरा पोलिसांनी दिली. भारत मेश्राम



हा मित्रांसह पर्यटनासाठी चिखलदऱ्याला आला होता. देवी पॉइंटवरील आकाशपाळण्याचा आनंद घेत असताना अचानक त्याचा तोल जाऊन तो खाली कोसळला. या अपघातात त्याच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली. जखमीला तातडीने उपचारासाठी चिखलदरा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी अमरावतीच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. चिखलदरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघात नेमका कशामुळे घडला तसेच संबंधित आकाशपाळण्याच्या सुरक्षाव्यवस्थेत काही त्रुटी होत्या का, याचाही तपास करण्यात येत आहे. पर्यटनस्थळांवरील आकाशपाळणे, झुले व साहसी खेळांसाठी आवश्यक सुरक्षा उपाययोजना अधिक कडक करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# झेडपी, पं. स. मध्ये पुन्हा लागणार आरक्षण कार्यक्रम

## वारे निवडणुकीचे : अनेकांची राजकीय गणिते बिघडणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** राज्यात डिसेंबरमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचे वारे वाहण्यास सुरवात झाली आहे. डिसेंबरमध्ये संभाव्य निवडणुकीचे संकेत मिळाल्यानंतर इच्छूक पुन्हा एकदा ॲक्टिव्ह मोडवर आले आहेत. न्यायालयीन निर्देशानुसार आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या आत असावी, ही अट घालण्यात आल्यानंतर पुन्हा एकदा अमरावती जिल्हा परिषदेत आरक्षण कार्यक्रम जाहीर होणार आहे. त्यामुळे अनेकांची गणिते बिघडणार आहेत. आरक्षणाचा कार्यक्रम लवकरच जाहीर होण्याचे संकेतसुद्धा प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. मात्र या प्रक्रियेत अनुसूचित जाती आणि जमातीसाठी राखीव असलेल्या जागांना हात लावता येणार नाही, केवळ नागरिकांचा मागासप्रवर्ग व सर्वसाधारण गटातील आरक्षणाच्या सध्याच्या स्थितीत बदल होणार आहे. त्यामुळे अनेकांनी यापूर्वी लावलेली राजकीय गणिते कोलमडणार आहेत. मागील अनेक वर्षांपासून जिल्हा परिषद आणि बहुतांश पंचायत समित्यांवर प्रशासकराज सुरू आहे. विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी जिल्हा परिषद तसेच १४ पंचायत समित्यांच्या ११८ गणांच्या आरक्षणाची प्रक्रिया प्रशासनाकडून करण्यात आली होती. त्यानंतर इच्छूक कामाला सुद्धा लागले होते. मात्र ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर न्यायालयाकडून या प्रक्रियेला स्थगिती देण्यात आल्यानंतर निवडणुकीचा वारू थंडबस्त्यात पडला. मात्र आता पुन्हा एकदा न्यायालयाच्या सुचनेनुसार शासनस्तरावर निवडणुका घेण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. डिसेंबरमध्ये संभाव्य निवडणुका होणार, असे गृहित धरून इच्छुकांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. परंतु पुन्हा एकदा आरक्षणात बदल होण्याचे संकेत असल्याने इच्छुकांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे. आता आरक्षणानंतरच पाहू, असेही काही मंडळी कार्यकर्त्यांना सांगताहेत.

### २०२२ चे पक्षीय बलाबल

**काँग्रेस** : २५,
**भाजप** : १३,
**राष्ट्रवादी काँग्रेस** : ०७,
**शिवसेना** : ०३,
**प्रहार** : ०५,
**युवा स्वाभिमान** : ०३,
**बसपा** : ०१,
**अपक्ष** : ०२

# अमरावतीच्या तीन जलतरणपटूंची भारतीय संघात निवड



### बँकॉक येथील वॉटरपोलो स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरण विभागाने आणखी एक मानाचा टप्पा गाठला असून बँकॉक येथे होणाऱ्या १२ व्या एशियन एज ग्रुप वॉटरपोलो चॅम्पियनशिपसाठी अमरावतीच्या स्वर्णीम मिलिंद चेपे, मंथन शिवणकर आणि शौर्य अमित गुप्ता या तीन जलतरणपटूंची भारतीय संघात निवड झाली आहे. या यशामुळे अमरावतीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. भारतीय संघात निवड झाल्यानंतर तिन्ही खेळाडूंनी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य तसेच मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांचे आशीर्वाद घेतले. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ हे देशातील जलतरण आणि वॉटरपोलो क्षेत्रातील अग्रगण्य प्रशिक्षण केंद्र म्हणून ओळखले जाते. मंडळाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जलतरण तलावावर नियमित सराव करणाऱ्या या तिन्ही खेळाडूंनी कठोर परिश्रम, सातत्य व उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर भारतीय संघात स्थान मिळविले आहे. या उल्लेखनीय यशाचे श्रेय खेळाडूंनी मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, अमरावती जलतरण संघटनेचे अध्यक्ष वसंतराव हरणे, प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, जलतरण विभागप्रमुख व प्रशिक्षक प्रा. डॉ. योगेश निर्मळ, प्रशिक्षक मयूर कुमार आणि वैभवी थेटे यांना दिले आहे. या यशाबद्दल मंडळाचे कार्याध्यक्ष ड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, डॉ. विकास कोळेश्वर तसेच मंडळातील सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि खेळाडूंनी तिन्ही जलतरणपटूंचे अभिनंदन केले.

# बदली प्रक्रियेत प्रशासनाकडून भेदभाव

## जिल्हा परिषद कर्मचारी युनीयनचा आरोप, पंचायत समित्यांमध्ये नियमांना हरताळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

शासनाच्या निर्देशानुसार सलग पाच वर्षे एकाच कार्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांचे कार्यालय बदल करणे अपेक्षित असताना अनेक पंचायत समित्यांमध्ये या नियमांना हरताळ फासण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला असून बदली प्रक्रियेत प्रशासन भेदभाव करीत असल्याचा आरोप जिल्हा परिषद कर्मचारी युनीयनने केला आहे. यासंदर्भात युनीयनचे अध्यक्ष पंकज गुल्हाने यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना तक्रारसुद्धा दिली आहे. त्यामुळे बदल्यांच्या मुद्द्यावर कर्मचारी विरुद्ध प्रशासन, असा सामना आता रंगणार आहे. सहा मे २०१४ च्या शासननिर्णयानुसार एकाच कार्यालयात पाच वर्षे सेवा पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कार्यालय बदल करण्याचे निर्देश आहेत. त्याच अनुषंगाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी १० जुलैपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत. असे असताना अनेक पंचायत समित्यांमध्ये या नियमांना हरताळ फासण्यात आल्याचा आरोप पंकज गुल्हाने यांनी केला आहे. अनेक पंचायत समिती स्तरावर सिंचन उपविभागात वरिष्ठ सहायकाचे पद उपलब्ध नसल्याचे दाखवण्यात आले आहे. आकृतिबंधामध्ये कमी झाल्याचे दाखवून बदलीस पात्र कर्मचाऱ्यांना तेथेच कायम ठेवण्यात आले आहे. या प्रक्रियेत काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. मात्र त्याच निकषात बसणाऱ्या अनेक कर्मचाऱ्यांना बदली नाकारण्यात आली आहे. निवडक कर्मचाऱ्यांची बदली थांबवण्यात आल्याचा आरोप युनीयनने केला आहे, तर दुसरीकडे बदलीस पात्र अधिकाऱ्यांची बदली नाकारण्यात आल्याने त्यांच्यात असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. यासंदर्भात युनीयनच्या वतीने उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून ही प्रक्रिया सुरळीत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अनेक पंचायत समिती स्तरावर पात्र कर्मचाऱ्यांची बदली थांबवण्यात आली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. तो दूर करावा, अशी आमची मागणी आहे.

**– पंकज गुल्हाने** अध्यक्ष, जिल्हा परिषद कर्मचारी युनीयन.




# रानभाजी महोत्सवातून विद्यार्थ्यांनी जपली निसर्गाशी नाळ

## १७५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट व श्री विश्वकृपा आयुर्वेदालय यांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३वरुड–** आधुनिक जीवनशैलीत वाढत्या जंक फूडच्या प्रभावामुळे दुर्लक्षित होत चाललेल्या औषधीगुणांनी समृद्ध रानभाज्यांचे महत्त्व विद्यार्थी व पालकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट व श्री विश्वकृपा आयुर्वेदालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सहावा 'रानभाजी महोत्सव' उत्साहात झाला. 'साद आरोग्याची... वाट निसर्गाची...' या ब्रीदवाक्याखाली झालेल्या महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे उद्घाटन निमा आयुर्वेद फोरम महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. अमोल ठवळी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. राम गोधने, सचिव अनिल गुल्हाने, कोषाध्यक्ष डॉ. वेदांत राजोरिया, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनपर भाषणात डॉ. ठवळी यांनी पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या रानभाज्यांमधील औषधी गुणधर्म, रोगप्रतीकारक शक्ती वाढविण्यातील त्यांचे महत्त्व आणि तरुण पिढीला पारंपरिक आहाराची ओळख करून देण्याची गरज अधोरेखित केली. गोपाल वानखडे यांनी विद्यार्थ्यांनी निसर्गाशी जोडलेले नाते कौतुकास्पद असल्याचे सांगितले. महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे इयत्ता सहावी ते आठवीतील १७५ विद्यार्थ्यांनी साकारलेले रानभाजी पाकप्रदर्शन. विद्यार्थ्यांनी विविध दुर्मिळ रानभाज्यांचे प्रदर्शन मांडत त्यांच्या औषधी गुणधर्मांची माहिती दिली. पालकांच्या सहकार्याने तयार केलेल्या भाजी, चटणी, पराठे, थालीपीठ, सूप, भाकरी, पुरी, ठेचा आदी पारंपरिक पदार्थांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. पदार्थांची पौष्टिकता, चव, सादरीकरण, स्वच्छता व माहितीच्या आधारे परीक्षकांनी मूल्यमापन करून



विजेत्यांची निवड केली. वर्ग सहावीमधून प्रथम मधुर अतिश लांगापुरे व यशवी मोनिक मदन, द्वितीय लावण्या किशोर कडू, अरांशा सुनील कुकडे, तृतीय राजवीर स्वप्नील खंडेलवाल तसेच वर्ग सातवीमधून प्रथम लावण्या प्रशांत वाडोदे, द्वितीय श्रीधा देवेंद्र विधळे, तृतीय पलाक्षी नीलेश मानेकर, तर वर्ग आठवीमधून प्रथम मनस्वी महेंद्र बहुरूपी, द्वितीय वेदिका गोवर्धन देशमुख, तृतीय मानवी संदीप जैस्वाल व शार्दुल प्रमोद ठोंबरे आदी विद्यार्थी या स्पर्धेत अव्वल ठरले. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष बक्षिसे आणि प्रमाणपत्रे देऊन गौरव करण्यात आला.

डॉ. चरण सोनारे व मुख्याध्यापिका माधुरी भोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित महोत्सवासाठी निमा आयुर्वेद फोरम, निमा वुमन फोरम, जायंट्स ग्रुप, आयुष विभाग, विविध सामाजिक संस्था, पालक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. संचालन अंचल काळे यांनी केले.

# स्वराज्य सेवा प्रतिष्ठानला १ लाख रुपये व मानपत्राने सन्मानित

## कर्म, समर्पण आणि कर्तृत्वाचे नाव म्हणजे सोमेश्वर पुसतकर - कुलगुरू अविनाश आवळगावकर

### लोक फाऊंडेशन, कृषी विकास प्रतिष्ठान, नगापूर व सोमेश्वर पुसतकर मित्र मंडळाचे संयुक्त आयोजन





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती–** माणूस जेव्हा जन्माला येतो तेव्हा तो केवळ शरीर धारण करतो. मात्र, मृत्यूनंतर ते शरीर जरी सुटले तरी तो आपल्या मागे आपले नाव सोडून जातो. लोक म्हणतात नावात काय ठेवले आहे, पण मी सांगतो की मृत्यूनंतर नावातच सर्वकाही असते आपल्या कर्म, समर्पण आणि कर्तृत्वाच्या बळावर आपले विचार जनमानसापर्यंत पोहोचवणारे स्व. सोमेश्वर पुसतकर हे अत्यंत सुसंस्कृत नेते होते, ज्यांचे नाव आता एका अमर गाथेत रूपांतरित झाले आहे, असे उद्गार मराठी विद्यापीठाचे कुलगुरू अविनाश आवळगावकर यांनी काढले.

स्थानिक हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या (हव्याप्रम) स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृहात रविवारी स्व. सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतीप्रत्यर्थ लोक फाउंडेशन,

फाउंडेशन, कृषी विकास प्रतिष्ठान (नागपूर) आणि सोमेश्वर पुसतकर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ६ व्या लोकगौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष शिवा काळे, सचिव प्रतीक पाथरे यांच्यासह संपूर्ण टीमला मान्यवरांच्या हस्ते १ लाख रुपये नकद, सन्मानपत्र आणिस्मृतीचिन्ह देऊन 'सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व वनराईचे विश्वस्त, माजी आमदार गिरीश गांधी हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून कृषी विकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्रीराम काळे, ज्येष्ठपत्रकार बाळासाहेब कुलकर्णी, माजी महापौर तथा मनपा विरोधी पक्षनेते विलास इंगोले आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. चांदूर बाजार येथील शिवा काळे यांनी स्थापन केलेल्या 'स्वराज्य सेवा प्रतिष्ठान' या संस्थेने अमरावती व विदर्भभरात उल्लेखनीय सामाजिक व ऐतिहासिक कार्य केले आहे.

मेळघाटमधील ऐतिहासिक गावीलगड किल्ल्यापासून नरनाळा, माहूर, लासूर, रिद्धपूर, कारंजा लाड, रामटेक, कुवारा भीमसेन, नगरधन, आमनेर अशा विविध ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन केले आहे ऐतिहासिक शोध मोहिमा: भोरकपयेथील ३० हजार वर्षे जुनी रॉक पेंटिंग, गायमुखची अश्मयुगीन चित्रे, सालबर्डीची पांडव लेणी व पांडव कचेरीचा शोध, खटकाली येथील राणी महाल शोध मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण. महिमापूरची यादवकालीन सात मजली विहीर, रिद्धपूरची सास-बहू विहीर, अचलपूरची सुलतान गढी व तळेगाव दशासर थील विहिरींचे संवर्धन त्यांच्या टीमने केले आहे. या सोहळ्याचे प्रास्ताविक अविनाश पांडे यांनी केले, तर आभारप्रदर्शन वैभव दलाल यांनी मानले. या कार्यक्रमाला हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, ॲड. प्रशांत देशपांडे, डॉ. सुभाष गवई, वृषाली पुसतकर, रेवन पुसतकर यांच्यासह नागरिक, इतिहासप्रेमी व युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### संवादाला प्राधान्य देणारे व्यक्तिमत्त्व: बाळासाहेब कुलकर्णी

ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब कुलकर्णी यांनी सांगितले की, सोमेश्वर पुसतकर यांनी नेहमी वादापेक्षा संवादाची गरज अधोरेखित केली. राजकीयकिंवासामाजिक जीवनात पराभवझाला तरीते कधीपराभूतझाले नाहीत, त्यांनीहार मानली नाही. त्यांनी सोडलेले विचारांचे कार्य आज त्यांच्या नावासारखेच अजरामर झाले आहे.

#### परकोट संरक्षणासाठीही पुढाकार घ्यावा: विलास इंगोले

माजी महापौर विलास इंगोले यांनी स्वराज्य सेवा प्रतिष्ठानच्या कायाचें कौतुक करतानाच अमरावती शहराची ऐतिहासिक ओळख असलेल्या 'परकोट' या वारशाचे जतनवसंवर्धन करण्यासाठीही प्रतिष्ठानने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. सोमेश्वर पुसतकर यांच्या आठवणींना उजाळा देताना ते म्हणाले की, पुसतकर हे जमिनीवरचे अष्टपैलू कार्यकर्ते होते. ते कसे जगले यापेक्षा त्यांचे कार्य किती लोकांच्या हिताचे ठरले हे महत्त्वाचे आहे. त्यांचा मुलगा रेवन पुसतकर हा देखील भविष्यात वडिलांचे नाव उज्ज्वल करेल, असाविश्वास त्यांनी व्यक्त केला.

#### इतिहास आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घाला: गिरीश गांधी

अध्यक्षीय भाषणात गिरीश गांधी यांनी पुरस्कार प्राप्त संस्थेचे अभिनंदन केले. तेम्हणाले, आयोजकांनी आतापर्यंत ३ व्यक्तींनाव ६ संस्थांना या पुरस्काराने गौरवले आहे. यंदा ज्या युवा संस्थेला पुरस्कार दिला आहे, ती संस्था आपल्या इतिहासाला भविष्याशी जोडण्याचे महान कार्य करत आहे. इतिहास समजून घेणे उत्तम आहेच, पण छत्रपती शिवाजी महाराजांचे युद्धकौशल्य आणि तंत्रज्ञान आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडल्यास अधिक मोठा बदल घडू शकतो. युद्ध आणि संरक्षणाची भाषा आता बदलली आहे, हे इराण-इस्रायल युद्धाने सिद्ध केले आहे.त्यांनी सुचवले की, अमरावती जिल्ह्यातील ऐतिहासिक गावीलगड किल्ल्याच्या पुनर्निर्माणासाठी उरफ फंडाचा वापर करून नियोजनबद्ध आराखडा तयार केला पाहिजे. आज पैशांची कमतरता नाही; गरज आहे ती इच्छाशक्तीची आणि नियोजनाची. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून किल्ले पुनरुज्जीवित केले तर देशपातळीवर एक नवा आदर्श निर्माण होईल आणि यातूनच करोडो मावळे घडतील.

# मध्यान्ह भोजनावरही 'एफडीए'ची नजर

### प्रत्येक शाळेतील भोजनाची होणार महिन्यातून दोनवेळा तपासणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती:**
शाळांमधील वर्ग एक ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मध्यान्न भोजन योजना सुरु आहे. विद्यार्थ्यांना सकस पोषण आहार मिळणे हा या योजनेचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांना मध्यान्न भोजनातून उद्देशाप्रमाणे सकस आहार मिळतो की नाही, याकडे आता अन्न व औषधी विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी लक्ष फिरविले आहे. त्यासाठी त्यांनी नियमावली तयार केली आहे. त्यामुळे शाळांच्या मुख्याध्यापकांवर मोठी जबाबदारी आली आहे.राज्यातील सर्व सरकारी व अनुदानीत शाळांमध्ये वर्ग १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना दुपारच्या सुट्टीत मध्यान्न भोजन दिले जाते. त्यासाठी शासनातर्फे पुरवठादारांमार्फत तांदूळ, डाळी, कडधान्य, मीठ मसाला पुरविला जातो. तर भाजीपाल, इंधन व पोषण आहारासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे रोख रक्कम शाळेला त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. प्रत्येक शाळेला स्वयंपाकी व मदतनीस यांची नियुक्ती केली गेली. त्यांचे मानधनही शासनातर्फ अदा केले जाते. शासनाने मध्यान्न भोजनाचा रोजचा मेन्यू ठरवून दिला आहे. त्याप्रमाणेच भोजन देणे सक्तीचे आहे. तसेच आठवड्यातून एक दिवस बिस्किट, अंडी, फळे असे पोषक पदार्थ देणेही बंधनकारक आहे. मात्र काही शाळांमध्ये याचे पालन केले जात नसल्याची पालकांची ओरड आहे. कित्येक शाळेत सोपस्कार म्हणून पिवळा भात करून निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते. त्यामुळे असंख्य विद्यार्थी ते खातच नाही. तसेच आठवड्यातून एक दिवस दिला जाणारा सकस आहारही दिला जात नाही, अशा तक्रारी शिक्षण विभागाकडे होत आहेत. यामुळे आता आयुक्त तुकाराम मुंढे यांनी शाळांच्या मध्यान्न भोजनाकडे नजर फिरविली आहे. आता प्रत्येक या पूर्वीच्या नियमानुसार शाळेपासून १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास बंदी करण्यात आली आहे. मात्र आता अन्न औषध विभागाच्या नव्या नियमानुसार शाळेच्या बाह्य भिंतीपासून ५० मीटर अंतराच्या मर्यादेत जंकफुड, वडापाव, साखरयुक्त द्रव्ये यांचीही विक्री करण्यास किंवा अशा पदार्थांची जाहिरात करण्यास बंदी घालण्यात आली असल्याचे तुकाराम मुंढे यांनी जाहिर केले आहेत. या नियमामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होणार आहे. या दोन्ही निर्णयांचे पालकवर्गातून स्वागत होत आहे.

जबाबदार घटकांवर होणार कारवाई शाळेतील मध्यान्न भोजनाची महिन्यातून दोनदा अन्न व सुरक्षा विभागाकडून तपासणी केली जाणार आहे. त्यामध्ये अन्नाचा दर्जा, स्वयंपाक खोलीची व भोजन कक्षाची स्वच्छता याकडे कटाक्षाने लक्ष दिले जाणार आहेत. तसेच शिक्षण विभागाचे अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी शिक्षण संस्थांचे व्यवस्थापक मंडळ, पालक, विद्यार्थी यांच्या याबाबतच्या जबाबदार्!या निश्चित करुन देण्यात आल्या आहेत. मध्यान्न भोजन योजनेत कसूर आढळून आल्यास सर्वच जबाबदार घटकांवर कारवाई करण्याचे सूतोवाच आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केले आहेत.

# शाळा सुरू होऊन एक महिना उलटला, अद्याप दुसऱ्या गणवेशासाठी निधी नाही

## शिक्षण विभागाने वरिष्ठांकडे केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती:**
जिल्ह्यात नवीन शैक्षणिक सत्र सुरू होऊन एक महिना उलटला आहे. मात्र, जिल्ह्यातील शासकीय शाळांमध्ये पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या गणवेशासाठी अद्याप निधी प्राप्त झालेला नाही.

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना २ गणवेश देण्याचा दावा करणाऱ्या शासन व प्रशासनाच्या या ढिसाळ कार्यपद्धतीबाबत पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पहिल्या गणवेशाच्या शिल्लक निधीसह दुसऱ्या गणवेशाचा पूर्ण निधी मिळून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला ३ कोटी ३९ लाख ९ हजार ३०० रुपयांच्या अनुदानाची प्रतीक्षा आहे. नवीन ऑनलाइन प्रणालीद्वारे शिक्षण विभागाने वरिष्ठ स्तरावर निधीची मागणी पाठविली आहे. जिल्ह्यातील १५५७ शासकीय व अनुदानित शाळांमध्ये पहिली ते आठवीपर्यंतच्या १लक्ष१ हजार ३३१ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश



योजनेचा लाभदिला जात आहे.


यासाठी शासनाने पहिल्या टप्प्यात प्रति गणवेश २४० रुपये या प्रमाणे २कोटी४३ लाख १९ हजार ४४० रुपये निधी मंजूर करून तालुकास्तरावर वितरित केला आहे. या निधीतही पालकांना स्वतःच्या खिशातून काही रक्कम खर्च करून एक गणवेश शिवून घ्यावा लागला आहे. हा गणवेश परिधान करूनच विद्यार्थी शाळेच्या पहिल्या दिवशी दाखल झाल्याचे सांगण्यात येते. प्रत्येक विद्यार्थ्याला दरवर्षी दोन गणवेश देण्याची तरतूद आहे. यामध्ये एक नियमित शालेय गणवेश, तर दुसरा स्काऊट-गाइड गणवेश असतो.दोन गणवेश करीता ६००रुपये देणे आवश्यक आहे.या मध्ये सर्व मुली, अनु.जाती मुले,अनु.जमाती मुले,बीपीएल मधिल मुले,उर्वरित मुले ओबिसी,सर्व साधारण मुले यांना याचा लाभ मिळतो.पण स्वातंत्र्य दिन येत असतांना दुसरा गणवेश करीता शाळांना निधी मिळाला नाही.तसेच शालेय खर्चा करीता समग्र शिक्षा अभियान निधी आणि सादिल रक्कम मिळाली नाही त्यामुळे शालेय खर्च मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या खिशातुन सुरु आहे.हा निधी सुध्दा शाळांना तात्काळ मिळावा अशी मागणी मुख्याध्यापक,शिक्षक,शाळा व्यवस्थापन समिती करीत आहे.

# अर्जुननगर येथे कारमध्ये तरुणाचा मृतदेह

## श्वास रोखल्याने मृत्यूचा प्राथमिक अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती :**
अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील अर्जुननगर परिसरात उभ्या असलेल्या कारमध्ये एका तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने सोमवारी परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह पुढील तपासासाठी ताब्यात घेतला.

मृताचे नाव विरल जसपारा (रा. बुटी प्लॉट, राजापेठ) असे आहे. तो एमएच २० बीवाय २३२८ क्रमांकाच्या चारचाकी वाहनात मृतावस्थेत आढळून आला. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये दारूच्या बाटल्या आढळून आल्या.



घटनेची माहिती परिसरात पसरताच घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. प्राथमिक माहितीनुसार श्वास रोखल्यामुळे मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असला, तरी मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# बापट चौकात मध्यरात्री खून; दोन संशयित आरोपी ताब्यात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** शहरातील बापट चौक परिसरात रविवारी उशिरा रात्री एका युवकाची हत्या करण्यात आली आहे. मृत युवकाची ओळख शरीफ बेग रशीद बेग (वय २५, रा. लालखडी) अशी झाली आहे. अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर धारदार शस्त्राने सपासप वार केले, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच शहर कोतवाली पोलीस आणि गुन्हे शाखेचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अवघ्या दोन तासांत मोठी कारवाई करत दोन संशयित आरोपींना जेरबंद केले आहे.डीबी पथकाने इरफान खान जावेद खान याला ताब्यात घेतले आहे, तर गुन्हे शाखेच्या पथकाने शेख रेहान शेख हारून याला ताब्यात घेतले आहे. सध्या पोलिसांनी दोन्ही संशयितांची कसून चौकशी सुरू केली असून, हत्येमागील नेमके कारण आणि इतर संबंधित बाबींचा तपास सुरू आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, या तपासामध्ये आणखी महत्त्वाचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# विष्णोराच्या पाण्याच्या टाकीतून निघाला भला मोठा नाग!

## बनावट सर्पमित्राचा खेळ पाहून नागरिक हादरले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मोर्शी –** मोर्शी तालुक्यातील विष्णोरा गावातील जीर्ण झालेली पाण्याची टाकी पडली असून तेथील साफसफाई सुरू असताना एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. टाकीच्या ढिगाऱ्यातून भला मोठा नाग निघाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. गेल्या अनेक दिवसांपासून धोकादायक असलेली विष्णोरा गावातील पाण्याची टाकी ग्रामपंचायतीने जमीनदोस्त केली होती. त्याची साफसफाई सुरू असताना मजुरांना त्या ढिगाऱ्यातून एक मोठा नाग दिसला. नागाला पाहताच काम करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. घाबरलेल्या नागरिकांनी तात्काळ धामणगाव काटपुर



[illegible] सर्पमित्रांना फोन करून बोलावले. परंतु आलेला सर्पमित्र कोणतेही सुरक्षा साधन न बाळगता ना हात हुक, ना बॅग, ना बूट – थेट हाताने साप पकडू लागला. इतकेच नाही तर नागाला पकडल्यानंतर त्याचा खेळ करून दाखवला. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की अशा प्रकारे चिथावल्यामुळे नाग चौथाळला असता आणि त्याने दंश केला असता तर मोठी दुर्घटना घडली असती. एका चाव्यात जीव जाऊ शकतो. आम्ही मदतीसाठी फोन केला, पण हा माणूस आमचाच जीव धोक्यात घालत होता अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली. गावकऱ्यांनी वनविभागाकडे मागणी केली आहे की, असे प्रशिक्षण नसलेले आणि सुरक्षेचे नियम न पाळणारे बनावट सर्पमित्रांवर तात्काळ कारवाई करावी. साप पकडण्यासाठी फक्त प्रमाणित सर्पमित्रांनाच बोलवावे. साप दिसल्यास त्याला मारू नका किंवा स्वतः पकडू नका. तात्काळ १९२६ वनविभाग हेल्पलाइन किंवा अधिकृत सर्पमित्राला संपर्क करा.

